# माहिती अधिकार कायद्यासंबधात नेहमी विचारले जाणारे प्रश्न

**विजय कुंभार**

**प्रश्न -' माहितीचा अधिकार ' कधी अस्तित्वात आला ?**

उत्तर - भारतात माहितीचा अधिकार अधिनियमाला १५ जून २००५ रोजी मान्यता दिली आणि तो १२ ऑक्टोबर २००५ रोजी अस्तित्वात आला .

**प्रश्न - तो कोणास लागू आहे ?**

उत्तर - तो, जम्मू व काश्मीर राज्य सोडून संपूर्ण भारतास लागू आहे.

**प्रश्न - हा कायदा करण्यामागचा उद्देश काय आहे?**

उत्तर -लोकशाही मध्ये माहितगार नागरी समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी तिच्या म्हणजे लोकशाहीच्या कार्यशीलतेच्या दृष्टीने , तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या , शासने व त्यांच्या व त्यांच्या यंत्रणांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्या दृष्टीने अत्यावश्यक असतात .म्हणून सार्वजनिक प्राधिकरणांच्या कामामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणण्यासाठी आणि उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी , सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळविता यावी यासाठी एक व्यवहार्य शासन पद्धत आखून देणे हा का कायद्याचा उद्देश आहे.

**प्रश्न - महाराष्ट्रात माहितीचा अधिकार अधिनियम अस्तित्वात होता त्याचे काय झाले ?**

उत्तर - केंद्रीय माहितीचा अधिकार अधिअनियम २००५ अस्तित्वात आल्यानंतर तो देशातील सर्व राज्यांना लागू झाला त्यामुळे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिअनियम २००२ निरसित झाला .

**प्रश्न - 'माहितीचा अधिकार ' म्हणजे काय ?**

उत्तर - 'माहितीचा अधिकार' याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व माहिती अधिकार अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये

(एक) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे;

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे

(चार) डिस्केट् , फ्लॉपी, टेप, व्हिडिओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठविलेली असेल त्याबाबतीत मुद्रित, प्रती (प्रिन्टआऊट) माहिती मिळविणे; याबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो;

**प्रश्न - माहितीच्या अधिकारांतर्गत माहिती कोण मागू शकतो ?**

उत्तर - कोणीही भारतीय नागरिक माहिती मागू शकतो .

**प्रश्न - माहिती कशासाठी हवी याचे कारण द्यावे लागते का ?**

उत्तर - नाही , माहिती कशासाठी हवी आहे याचे कारण द्यावे लागत नाही , आणि तसे विचारण्याचा अधिकारही कोणाला नाही.

**प्रश्न - माहिती मिळाल्यानंतर पुढे काय ?**

उत्तर - माहितीचा अधिकार वापरून फक्त माहिती मिळविता येते , मिळालेल्या माहितीचे काय करायचे ?, तीचा वापर कसा करायचा ?, आपले काम कसे करून घ्यायचे ?, मिळालेल्या माहितीच्या आधारे कोणाकडे दाद मागायची याचा निर्णय माहिती मिळविणाऱ्याने घ्यावयाचा असतो .

**प्रश्न - सर्वसाधारणपणे माहितीचे प्रकार किती ?**

उत्तर -सर्वोच्च न्यायाल्याने एका निर्णयात केलेल्या व्याख्येनुसार माहितीचे तीन प्रकार असतात

१) जी माहिती सार्वजनिक केल्यामुळे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणात पार्दर्शकता आणि उत्तरदायित्व वाढीला लागेल आणि ज्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल किंवा भ्रष्टाचारापासून परावृत्त करेल अशी कलम ४(१) (ख) आणि (ग) मध्ये समावेश असलेली माहिती.

२)कलम ४ (२) (ख) आणि (ग) मध्ये समावेश नसलेली परंतु सार्वजनिक प्राधिकरणाच्या ताब्यातील किंवा नियंत्रणाखालील माहिती.

३) सार्वजनिक प्राधिकरणाच्या ताब्यात किंवा नियंत्रणात नसलेली आणि अस्तित्वातील कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकारणाला न मिळविता येणारी माहिती.

**प्रश्न - ' माहिती ' म्हणजे काय ?**

'उत्तर - माहिती' याचा अर्थ कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्र, नमुने, प्रतिमाने/(मॉडेल), कोणताही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधार सामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात आलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो;

**प्रश्न - ' अभिलेख' म्हणजे काय ?**

उत्तर - 'अभिलेख' म्हणजे

(क) कोणताही दस्तऐवज, हस्तलिखित व फाईल

(ख) एखाद्या दस्तऐवजाची कोणतीही मायक्रोफिल्म, मायक्रोफिश आणि प्रतिरूप प्रत

(ग) अशा मायक्रोफिल्ममध्ये संग्रहित केलेल्या प्रतिमेची किंवा प्रतिमांचे कोणतीही नक्कल (मग ती परिवर्धित केलेली असो या नसो)

(दोन) संगणकाव्दारे किंवा कोणत्याही अन्य उपकरणाव्दारे तयार केलेले कोणतेही अन्य साहित्य यांचा समावेश होतो

**प्रश्न - माहितीचे अवलोकन म्हणजे काय ?**

उत्तर - एखादे काम, दस्तऐवज किंवाअभिलेख यांची पाहणी करणे

**प्रश्न - माहिती अधिकारातील कलम ४ आणि कलम ६ नुसार केल्या जाणाऱ्या अवलोकनामध्ये काय फरक आहे .**

उत्तर -कलम ४ नुसार माहितीचे अवलोकन करताना त्यासाठी कोणत्याही प्रकारचा अर्ज करावा लागत नाही कारण ती माहिती त्या सार्वजनिक प्राधिकरणाने स्वयंप्रेरणेने प्रकट केलेली माहिती असते आणि तीचे अवलोकन करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही मात्र त्यातील अभिलेखांच्या प्रती घ्यावयाच्या झाल्यास त्यासाठी विहित शुल्क द्यावे लागते .

कलम ६ नुसार माहितीचे अवलोकन करण्यासाठी विहित शुल्क भरून अर्ज करावा लागतो आणि अवलोकनासाठीसुद्धा विहित फी आकारली जाते .

**प्रश्न - माहितीच्या अधिकाराचा अर्ज कोठे विकत मिळतो** ?

उत्तर – माहितीच्या अधिकाराचा अर्ज कोठेही विकत मिळत नाही , विहित  नमून्यात साध्या कागदावर अर्ज केला तरी चालते .

**प्रश्न – माहिती अधिकारातील एका अर्जात किती विषयांची माहिती मागावी ,किती प्रश्न विचारावेत किंवा इतर काही बंधने आहेत का?**

उत्तर – मूळ कायद्यात तशी काही बंधने नाहीत , मात्र काही 'समुचित शासनांनी ' आपल्या नियमांमध्ये सुधारणा करून तशी बंधने घातली आहे . महाराष्ट्र शासनाने माहिती अधिकारतील एका अर्जात एकाच विषयाची माहिती मागण्याचे तसेच एका अर्जात सर्वसाधारणपणे दीडशे पेक्षा जास्त शब्दसंख्या असू नये असे बंधन घातलेले आहे .

**प्रश्न –कायद्यानुसार  किती दिवसात माहिती द्यावी लागते ?**

उत्तर – माहिती देण्याचा निर्णय घेतल्यास जन माहिती अधिकाऱ्याला अर्ज मिळाल्यापासून जास्तीस जास्त तीस दिवसांच्या आत माहिती द्यावी लागते . मात्र माहिती देण्याबात 'त्रयस्थ पक्षाकडे ' विचारणा केली असल्यास जास्तीत जास्त चाळीस दिवसात माहिती द्यावी लागते .परंतू माहिती जर एखाद्याच्या जीविताशी निगडीत असेल तर ती अठ्ठेचाळीस तासांच्या आत द्यावी लागते .

**प्रश्न – विहित मुदतीत म्हणजे तीस दिवसात  माहिती दिली नाही तर काय होते ?**

उत्तर –विहित मुदतीत माहिती दिली नाही तर  मागीतलेली माहिती निशुल्क द्यावी लागते .

**प्रश्न – माहिती अधिकारात प्रश्नार्थक माहिती मागता येते का ?**

उत्तर – माहिती अधिकारात प्रश्नार्थक माहिती विचारता येते ?त्यावर कोणतेही बंधन नाही .

**प्रश्न –माहिती अधिकारात सल्ला किंवा अभिप्राय देता येतात का ?**

उत्तर  – जर असे  सल्ले  किंवा अभिप्राय अभिलेखवात अगोदरच उपलब्ध असतील तर ते देता येतात , परंतु माहिती अधिकारात अर्ज केला म्हणून सल्ला किंवा अभिप्राय मागवून किंवा मिळवून देता येत नाही .

**प्रश्न – माहिती अस्तित्वात नसल्यास जन माहिती अधिकाऱ्याने काय करावे ?.**

उत्तर – माहिती अस्तित्वात नसल्यास जन माहिती अधिकाऱ्याने ती माहिती आपल्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियमानुसार उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे का ते पाहून निर्णय घ्यावा म्हणजे जर माहिती उपलब्ध असणे आवश्यक असेल तर ती उपलब्ध करून द्यावीच लागते केवळ ती उपलब्ध नाही असे सांगूण  माहिती नाकरता येणार नाही ती पुन्हा तयार करावी लागेल किंवा माहिती नाहिशी झाल्याबद्दल  पोलिसात तक्रार करावी लागेल आणि त्याची माहिती संबधित अर्जदाराला द्यावी लागेल .

**प्रश्न – पोस्टाने माहिती मागविता येते का ?**

उत्तर –  हो , विहित फी जोडून अर्ज पोस्टाने पाठविता येतो आणि विहीत फी भरून पोस्टाने माहिती मागवता येते .

**प्रश्न –पोस्टाने  केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज पाठविण्यासाठी काय करावे लागते ?**

उत्तर – केंद्र शासनाने बहुतेक सर्व गावांमधील काही पोस्ट ऑफिसेसमध्ये अर्ज स्विकारण्याची सोय केली आहे त्याप्रमाणे पोस्टात माहिती अधिकाराचे अर्ज स्विकारले जातात आणि ते संबधित सार्वजनिक प्राधिकरणाकडे पाठविले देखील जातात .

**प्रश्न – कोणते प्रश्न विचारू नयेत अथवा कोणती माहिती मागू नये ?**

उत्तर – कोणतेही प्रश्न विचारण्यावर कायद्याने काही बंधन नाही , मात्र सार्वजनिक प्राधिकरणाच्या ताब्यात किंवा नियंत्रणात नसलेली आणि अस्तित्वातील कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक

प्राधिकारणाला न मिळविता येणारी माहिती  मागणारे  प्रश्न विचारू नयेत किंवा त्याविषयी माहिती मागू नये .

**प्रश्न  – माहितीच्या अधिकारात केलेला अर्ज त्या त्या सार्वजनिक  प्राधिकरणाशी संबधित नसेल तर काय करायचे ?**

उत्तर – त्या अर्जातील माहितीचा जेवढा भाग त्या सार्वजनिक प्राधिकरणाशी संबधित आहे तेवढी माहिती द्यावी. आणि उर्वरीत माहिती दुसऱ्या परंतू एकाच सार्वजनिक प्राधिकरणाशी संबधित असल्यास त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे वर्ग करून तसे अर्जदारास कळवावे . सार्वजनिक प्राधिकारणांची संख्या एकापेक्षा जास्त असल्यास अर्जदाराला त्या त्या प्राधिक रणकडे अर्ज करण्यास सांगावे  .

**प्रश्न – कोणती माहिती पुरविण्याचे बंधन जनमाहिती अधिकाऱ्यावर नसते ?**

उत्तर – खालील माहिती पुरविण्याचे बंधन नसते

१) जी माहिती प्रकट केल्याने भारताच्या सार्वभौमत्वाला किंवा एकात्मेला, राज्याच्या सुरक्षेला, युध्दतंत्रविषयक, वैज्ञानिक किंवा आर्थिक हितसंबंधाना, परकीय राज्याबरोबरच्या संबंधांना बाधा पोहोचेल किंवा अपराधाला चिथावणी मिळेल, अशी माहिती;

२) कोणत्याही न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने जी प्रकाशित करण्यास स्पष्टपणे मनाई केली आहे किंवा जी प्रकट केल्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकेल, अशी माहिती;

३) जी प्रकट केल्याने संसदेच्या किंवा राज्य विधानमंडळाच्या विशेषाधिकाराचा भंग होईल, अशी माहिती;

४) वाणिज्य क्षेत्रातील विश्वासार्हता , व्यावसायिक गुपिते किंवा बौध्दिक संपदा यांचा समावेश असलेली , जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त, जी प्रकट केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल, अशी माहिती;

५) जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल त्या माहिती व्यतिरिक्त, एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे तिला उपलब्ध असणारी माहिती;

६) विदेशी शासनाकडून विश्वासपूर्वक मिळालेली माहिती:

७) जी प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जिवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती;

८) ज्या माहितीमुळे अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियांमध्ये अडथळा येईल, अशी माहिती;

९) मंत्रिमंडळाची कागदपत्रे, तसेच, मंत्रिपरिषद, सचिव व इतर अधिकारी यांच्या विचारविमर्शाचे अभिलेख:

परंतु, मंत्रिपरिषदेचे निर्णय, त्याची कारणे आणि ज्या आधारावर ते निर्णय घेण्यात आले होते ती सामग्री ही, निर्णय घेतल्यानंतर आणि ते प्रकरण पूर्ण झाल्यावर किंवा समाप्त झाल्यावर जाहीर करावी लागते

१०) जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, आणि जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही

किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करील, अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती:

परंतु, जी माहिती संसदेला किंवा राज्य विधानमंडळाला देण्यास नकार देता येणार नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता येणार नाही.

.१२) एखादी माहिती पुरविण्याच्या विनंतीमुळे जर, राज्याव्यतिरिक्त अन्य एखाद्या व्यक्तीच्या कॉपीराईटचे उल्लंघन होत असेल तर, कलम ८ च्या तरतुदींना बाधा न येऊ देता, यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकाज्यास, किंवा राज्य जन माहिती अधिकाज्यास, अशी माहिती पुरवण्याची विनंती नाकारता येईल.

**प्रश्न – माहितीचा काही भाग देता येतो का ?**

उतार – होय, जी माहिती माहिती अधिकारातर्गत देण्यास अपवाद केला आहे अशी माहिती वगळून जी देणे काद्यानुसार आवश्यक असा माहितीचा काही भाग देता येतो .

**प्रश्न – केंद सरकारच्या वेगवेगळ्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकाऱ्यांची नांवे व पत्ते कोठे मिळतील ?**

उत्तर – बहुतेक सर्व शासकीय कार्यालयांची आता संकेतस्थळे आहेत त्यावर जन माहिती अधिकाऱ्यांची व अपील प्राधिकाऱ्यांची नांवे असतात . तसेच बहुतेक सर्व शहरात पोस्टामध्ये केंद्रीय माहिती अधिकाराचा अर्ज स्विकारायची सोय केलेली आहे . पोस्टात जाउन आपण अर्ज व फी देउ शकता.त्यासाठी माहिती अधिकाऱ्याचे नाव माहिती असण्याची गरज नाही.

**प्रश्न – काही माहिती अधिकारी अर्ज दुसऱ्या विभागातील माहिती अधिकाऱ्याकडे वर्ग करतात , आणि परस्पर माहिती द्यायला सांगतात ते योग्य आहे का?**

उत्तर – एकाच सार्वजनिक प्राधिकरणात एका माहिती अधिकाऱ्याकडून दुसऱ्या माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज वर्ग करता येत नाहीत . ज्या जन माहिती अधिकाऱ्याने अर्ज स्विकारला त्यानेच माहिती देणे बंधन कारक आहे. अर्ज दुसऱ्या सार्वजनिक प्राधिकरणाशी संबधित असेल तर मात्र असा अर्ज वर्ग करता येतो.

**प्रश्न – माहितीचा अधिकार कोणाकोणाला लागू नाही ?**

उत्तर – माहिती अधिकारातील अनुसूची दोन मध्ये नमूद केलेल्या आणि कलम २४ अन्वये केंद्र किंवा राज्य शासनाने या अनुसूचीत समाविष्ट केलेल्या संस्थाना हा अधिकार लागू नाही परंतु भ्रष्टाचार व मानवी हक्कांचे उल्लंघन यांच्या आरोपांशी संबंधित माहिती द्यावी लागते

मात्र मागितलेली माहिती ही, मानवी हक्काच्या उल्लंघनाच्या आरोपासंदर्भात असल्यास, ती माहिती केंद्रीय माहिती आयोगाची मान्यता मिळाल्यावरच पुरविता येते , आणि ती विनंतीचा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत द्यावी लागते .

**प्रश्न – 'फाइल नोटींग्ज' म्हणजे काय ?**

उत्तर – फाईल नोटीग्ज म्हणजे ज्यांनी ज्यांनी ती फाइल हाताळली त्यांनी त्यांनी त्यावर लिहिलेल्या टीपण्या .

**प्रश्न – 'समुचित शासन ' म्हणजे काय ?**

उत्तर – (क) 'समुचित शासन' याचा अर्थ,–

(एक) केंद्र सरकार किंवा संघराज्य क्षेत्र प्रशासन यांच्याकडून स्थापन करण्यात आलेल्या, घटित करण्यात आलेल्या, त्यांच्याकडे मालकी असलेल्या, त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या अथवा त्यांच्याकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे निधीव्दारे ज्यांना मोठघा प्रमाणात वित्त पुरवठा करण्यात येतो, अशा सार्वजनिक प्राधिकरणांच्या बाबतीत, केंद्र सरकार, असा आहे;

(दोन) राज्य शासनांकडून स्थापन करण्यात आलेल्या, घटित करण्यात आलेल्या, त्यांच्याकडे मालकी असलेल्या, त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या अथवा त्यांच्याकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे निधीव्दारे ज्यांना मोठघा प्रमाणात वित्त पुरवठा करण्यात येतो अशा सार्वजनिक प्राधिकरणांच्या बाबतीत, राज्य शासन असा आहे;

**प्रश्न – 'सक्षम प्राधिकारण म्हणजे काय ?**

उत्तर – ) 'सक्षम प्राधिकारण' याचा अर्थ –

(एक) लोकसभेच्या किंवा राज्य विधानसभेच्या बाबतीत किंवा अशा प्रकारच्या सभा असणाऱ्या संघराज्य क्षेत्राच्या बाबतीत, अध्यक्ष आणि राज्यसभा किंवा राज्य विधान परिषद यांच्या बाबतीत सभापती;

(दोन) सर्वोच्च न्यायालयाच्या बाबतीत, भारताचे मुख्य न्यायमूर्ती

(तीन) उच्च न्यायालयाच्या बाबतीत, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती;

(चार) संविधानाव्दारे किंवा तद्न्वये स्थापन किंवा घटित करण्यात आलेल्या अन्य प्राधिकरणाच्या बाबतीत यथास्थिती, राष्ट्रपती किंवा राज्यपाल

(पाच) संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये नियुक्त करण्यात आलेला प्रशासक असा आहे.

**प्रश्न – ' सार्वजनिक प्राधिकरण ' म्हणजे काय ?**

उत्तर –'सार्वजनिक प्राधिकरण' याचा अर्थ –

(क) संविधानाव्दारे किंवा तदन्वये,

(ख) संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याव्दारे

(ग) राज्य विधान मंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याव्दारे

(घ) समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था असा आहे आणि त्यामध्ये,

(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीव्दारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोॉ प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय

(दोन) समुचित शासनाकडून निधीव्दारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ' प्रमाणात वित्त पुरवठा केला जाते अशी अशासकीय संघटना याचा समावेश होतो

**प्रश्न – माहिती अधिकारासंदर्भात' सार्वजनिक प्राधिकरणाची ' कर्तव्ये काय ?**

उत्तर – आवश्यकतेनुसार जन माहिती अधिकाऱ्यांची आणि अपील प्राधिकाऱ्यांची नेमणूक करणे तसेच कलम ४ ची अंमलबजावणी करणे ही सार्वजनिक प्राधिकरणांची कर्तव्ये असतात .

**प्रश्न – सार्वजनिक प्राधिकरणावरील आबंधने कोणती ?**

उत्तर –

१)माहिती अधिकारातील कलम ४ (१) (ब) मधिल सतरा बाबींची माहिती प्रकट करून ती वारंवार अद्ययावत करणे .

२) याकलमानुसार प्रकट केलेली माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील जाहिर करणे .

३)ज्यामुळे लाकांना बाधा पोहोचते अशी महत्त्वाची धोरणे आखताना आणि असे निर्णय जाहीर करतांना सर्व संबंधित वस्तुस्थिती प्रसिध्द करणे

४)  आपल्या प्रशासनिक किंवा न्यायिकवत निर्णयांबाबतची कारणे बाधित व्यक्तींना कळवीणे

**प्रश्न – कलम ४ (१) नुसार माहिती प्रकट केली नाही तर शास्तीस कोण पात्र ठरते ?**

उत्तर – कलम ४(१) नुसार प्रकट करावयाची माहिती जरी जन माहिती अधिकाऱ्याकडे ठेवायची असली तरी , अशी माहिती तयार करण्याची जबाबदारी ही त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखाची असते ,त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्याने कळवूनही त्याने तशी माहिती तयार करून ती प्रकट केली नाही आणि त्याबाबतीत कोणी माहिती अधिकारातील कलम १८ नुसार तक्रार केली तर तो मानीव जन माहिती अधिकारी या नात्याने शास्तीस पात्र ठरू  शकतो .

**प्रश्न –' जन माहिती अधिकारी ' म्हणजे काय ?**

उत्तार  – माहिती अधिकार अधिनियमान्वये  माहिती मिळण्याची विनंती करणाऱ्या व्यक्तींना माहिती देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणांच्या  प्रशासकीय युनिटामध्ये किंवा कार्यालयांमध्ये नेमलेला अधिकारी म्हणजे जन माहिती अधिकारी .

**प्रश्न – जनमाहिती अधिकाऱ्याची कर्तव्ये काय ?**

उत्तर –जन माहिती अधिकाऱ्याची कर्तव्ये

अ) माहिती मिळण्याची विनंती करणारा अर्ज मिळाल्यावर, शक्य तितक्या शीघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत विनंती केल्यापासून तीस दिवसांच्या आत, एकतर विहित करण्यात आलेल्या फीचे प्रदान केल्यावर माहिती देणे, किंवा कलम ८ व ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कारणांपैकी कोणत्याही कारणासाठी विनंतीचा अर्ज फेटाळने .

ब) जर मागितलेली माहिती, एखाद्या व्यक्तीचे जीवित वा स्वातंत्र्य यासंबंधातील असेल तर, विनंतीचा अर्ज मिळाल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत ती देणे

क) माहिती मागणारी व्यक्ती ज्ञानेंद्रियांच्या दृष्टीने विकलांग असल्यास त्याबाबतीत  माहिती मिळवणे ज्यायोगे शक्य होईल असे ,  तसेच माहितीची पाहणी करण्यासाठी उचित असेल असे तीला सहाय्य देणे.

क ) माहिती त्रयस्थ पक्षाची असल्यास त्रयस्थ पक्षाला त्याबाबत कळविणे आणि त्रयस्थ पक्षाने कलम ११ अन्वये केलेले निवेदन विचारात घेणे.

ड) माहितीच्या  विनंतीचा अर्ज फेटाळल्याच्या विरोधात अपील करता येईल तो कालावधी ; आणि अपील प्राधिकरणाचा तपशील अर्जदाराला  कळविणे.

इ) माहिती देण्यासाथी सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत नसल्यास, किंवा प्रस्तुत अभिलेख सुरक्षित ठेवण्याच्या किंवा जतन करण्याच्या दृष्टीने ते हानीकारक नसल्यास, माहिती ज्या स्वरूपात मागण्यात आली असेल त्याच स्वरूपात ती सर्वसाधारणपणे, पुरविणे.

**प्रश्न – 'सहाय्यक जन माहिती अधिकारी ' म्हणजे काय ? त्याची कर्तव्ये काय ?**

उत्तर –  माहिती अधिकार अधिनियमान्वये केलेले अर्ज  किंवा अपीले स्विकारून ती जन माहिती अधिकारी , अपील प्राधिकारी किंवा माहिती आयोगाकडे पाठविण्यासाठी नेमलेला अधिकारी म्हणजे 'सहाय्यक जन माहिती अधिकारी '

**प्रश्न  –' सहाय्यक जन माहिती अधिकारी ' शास्तीस पात्र असतो का ?**

उत्तर – जन माहिती अधिकाऱ्याने घेतलेल्या निर्णयावरील अपीलात शास्ती झाल्यास त्याबद्दल सहाय्यक जन माहिती अधिकारी  शास्तीस पात्र ठरत नाही , मात्र त्याने वेळेत जन माहिती

अधिकाऱ्याकडे अर्ज न पाठविल्यामुळे जर माहिती देण्यास विलंब झाला आणि त्याबाबत अपील किंवा तक्रार झाली तर तो शास्तीस पात्र ठरतो

**प्रश्न –' मानीव जन माहिती अधिकारी 'म्हणजे काय ?.**

उत्तर – जन माहिती अधिकारी, त्याची किंवा तिची कर्तव्ये योग्य प्रकारे पार पाडण्यासाठी त्याला किंवा तिला आवश्यकता वाटेल अशा ज्या अधिकाऱ्याचे सहाय्य मागतो किंवा मागते त्याला किंवा तीला' मानीव जन माहिती अधिकारी' असे म्हणतात .

**प्रश्न –' मानीव जन माहिती अधिकारी' शास्तीस पात्र असतो का ?**

उत्तर – होय , जर 'मानीव जन माहिती अधिकाऱ्यामुळे 'माहिती देण्यास विलंब झाला, चुकीची किंवा अपुरी माहिती दिली गेली या बाबी सिद्ध झाल्या तर तो किंवा ती शास्तीस पात्र ठरते .

**प्रश्न – एका सार्वजनिक प्राधिकरणात जास्तीत जास्त किती जन माहिती असू शकतात ?**

उत्तर –सार्वजनिक प्राधिकरण आपल्या आवश्यकतेनुसार कितीही जन माहिती अधिकारी नेमू शकते.

**प्रश्न – अपील प्राधिकारी म्हणजे काय ?**

उत्तर – जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरूद्ध ज्याच्याकडे अपील करावयाचे असते असा अधिकारी म्हणजे अपील प्राधिकारी .

**प्रश्न – अपील प्राधिकाऱ्याची कर्तव्ये काय ?**

उत्तर – जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयावर अर्जदाराने कलम १९ नुसार केलेल्या अपीलावर तीस दिवसांच्या आत किंवा कारणे नमूद जास्तीत जास्त पंचेचाळीस दिवसांच्या आत निर्णय देणे

**प्रश्न – कोणती माहिती अठ्ठेचाळीस तासात मागता येते ?**

उत्तर – कोणाच्याही जिवताशी संबधीत असलेली माहिती अठ्ठेचाळीस तासात मागता येते .

**प्रश्न –' त्रयस्थ पक्ष ' म्हणजे काय ?**

उत्तर – 'त्रयस्थ पक्ष' याचा अर्थ, माहिती मिळण्याची विनंती करणारी नागरिकाव्यतिरिक्त अन्य एखादी व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, सार्वजनिक प्राधिकरणाचा समावेश होतो.

**प्रश्न – त्रयस्थ पक्षाशी संबधित माहिती मागीतली असेल तर जन माहिती अधिकाऱ्याने काय करावे ?**

उत्तर – माहिती अधिकारातील कलम ११ नुसारया अधिनियमान्वये केलेल्या विनंतीवरून जेव्हा, जन माहिती अधिकाऱ्यास, त्रयस्थ पक्षाशी संबंधित असलेली किंवा त्यांच्याकडून पुरविण्यात आलेली आणि त्या त्रयस्थ पक्षाकडून गोपनीय समजली जाणारी कोणतीही माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग पुरवावयाचा असेल तेव्हा जन माहिती अधिकाऱ्याने, अशी विनंती करण्यात आल्यापासून पाच दिवसांच्या आत त्या विनंतीबाबत म्हणजे ती माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग, प्रकट करण्यास इच्छुक असल्याबाबत लेखी नोटीस अशा त्रयस्थ पक्षास दिली पाहिजे आणि त्रयस्थ पक्षाला, अशी माहिती प्रकट करावी किंवा कसे, या संबंधात लेखी किंवा मौखिक निवेदने सादर करण्यासाठी, आमंत्रित केले पाहिजे आणि माहिती प्रकट करण्याचा निर्णय घेताना त्रयस्थ पक्षाचे असे निवेदन विचारात घेतले पाहिजे.

परंतु, कायद्याचे संरक्षण दिलेल्या व्यावसायिक किंवा वाणिज्यिक गुपितांच्या बाबतीत असेल ते खेरीज करून, जर लोकहितार्थ अशी माहिती प्रकट करणे हे, अशा त्रयस्थ पक्षाच्या हिताला होणारी कोणतीही संभाव्य हानी किंवा क्षती यापेक्षा अधिक महत्वाचे असेल तर, ती माहिती प्रकट केली पाहिजे.

जन माहिती अधिकाऱ्याकडून, कोणत्याही माहितीच्या किंवा अभिलेखाच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधात, त्रयस्थ पक्षावर नोटीस बजावण्यात आली असेल अशा बाबतीत, अशी नोटीस

मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत, प्रस्तावित माहिती प्रकट करण्याविषयी निवेदन करण्याची त्रयस्थ पक्षास संधी दिली पाहिजे .

जन माहिती अधिकाऱ्याने, माहितीचा अर्ज मिळाल्यानंतर चाळीस दिवसांच्या आत,निवेदन करण्याची त्रयस्थ पक्षास संधी देण्यात आलेली असल्यास, ती माहिती किंवा अभिलेख किंवा त्याचा भाग प्रकट करावा किंवा करू नये, याबाबत निर्णय घेतला पाहिजे आणि त्याच्या निर्णयाची लेखी नोटीस त्रयस्थ पक्षास दिली पाहिजे.

जन माहिती अधिकाऱ्याने ,आपल्या निर्णयात 'ज्याला नोटीस देण्यात येते असा त्रयस्थ पक्ष, त्या निर्णयाविरूध्द कलम १९ अन्वये अपील दाखल करण्यास हक्कदार आहे , या विधानाचा समावेश केला पाहिजे.

**प्रश्न –द्वितीय अपिल निकाली  काढणेसाठी कालमर्यादा आहे का ?**

उत्तर – द्वितीय अपील निकाली काढण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित नाही

**प्रश्न – मुदतीत माहिती दिली नाही तर अपील प्राधिकाऱ्यास शास्तीचे अधिकार आहेत का ?**

उत्तर – अपील प्राधिकाऱ्यास शास्तीचे अधिकार नाहीत .

**प्रश्न – अपील कोणाकडे करावे ?**

उत्तर – जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तराने समाधान न झाल्यास अपील प्राधिकाऱ्याकडे आणि अपील प्राधिकाऱ्याचाही उत्तराने समाधान न झाल्यास यथास्थिती राज्य किंवा केंद्रीय माहिती आयोगाकडे अपील करावे .

**प्रश्न – अपील प्राधिकक्काऱ्याने विहीत मुदतीत अपील निकाली काढले नाही तर तर त्याला शास्ती होते का ?**

उत्तर – नाही , अपील प्राधिकाऱ्यावर शास्ती लावण्याची माहिती अधिकारात तरतूद नाही .

**प्रश्न – अपील कसे करावे ?**

उत्तर – महाराष्ट्र शासनाशी संबधित सार्वजनिक प्राधिकरणांकडे अपील करताना विहीत नमून्यात साध्या कागदावर अपील करावे आणि त्यावर वीस रुपयांचा कोर्ट फी स्टँप लावावा. केंद्रीय सार्वजनिक प्राधिकरणांकडे अपील करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही .

**प्रश्न – माहिती कोणाला निशुल्क मिळते ?**

उत्तर – दारीद्रय रेषेखालील अर्जदारांना माहिती निशुल्क मिळते

**प्रश्न – माहिती आयुक्तांचा निर्णय मान्य नसल्यास किंवा त्यांनी अपील फेटाळल्यास दाद कोणाकडे मागायची ?**

उत्तर – माहिती आयुक्तांच्या निर्णयाविरूद्ध किंवा त्यांनी कोणत्याही कारणास्तव  अपील फेटाळल्यानंतर  उच्च न्यायालयात दाद माग़ण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नाही.

**प्रश्न – माहिती देउ नये असा ठराव कोणतेही सार्वजनिक प्राधिकरण करू शकते का?**

उत्तर – नाही , असा ठराव कोणतेही सार्वजनिक प्राधिकरण करू शकत नाही .

**प्रश्न – केंद्रीय माहिती आयोगाची व राज्य माहिती आयोगाची स्थापना कशी होते ?**

उत्तर – केंद्र शासन किंवा राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे '(राज्याचे नाव) माहिती आयोग'  या नावाने ओळखला जाणारा निकाय, या अधिनियमान्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याला नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी स्थापन करतात

**प्रश्न – माहिती आयोगाच्या सदस्यांची संख्या किती असते ?**

उत्तर – केंद्रीय माहिती आयोगात आणि राज्य माहिती आयोगातही मुख्य माहिती आयुक्त आणि आवश्यक्तेनुसार परंतु दहापेक्षा जास्त नाहीत इतके आयुक्त ,सदस्य असतात .

**प्रश्न – माहिती आयुक्त पदासाठी कोण पात्र असते ?**

उत्तर – कायदा. विज्ञान, समाजसेवा, व्यवस्थापन, पत्रकारिता, जनसंपर्क माध्यम किंवा प्रशासन आणि शासन या विषयांचे व्यापक ज्ञान व अनुभव असलेल्या, सार्वजनिक जीवनातील प्रख्यात व्यक्ती मुख्य माहिती आयुक्त किंवा माहिती आयुक्त या पदासाठी पात्र असतात

**प्रश्न – माहिती आयुक्तांची नियुक्ती कशी होते ?**

उत्तर – केंद्रीय मुख्य माहिती आयुक्ताची व माहिती आयुक्तांची नियुक्ती, राष्ट्रपती, पुढील व्यक्तींच्या मिळून बनलेल्या समितीच्या शिफारशीनुसार करतात

(एक) प्रधानमंत्री, जे या समितीचे अध्यक्षपदीय व्यक्ती असतात ;

(दोन) लोकसभेतील विरोधी पक्षनेता; आणि

(तीन) प्रधानमंत्र्यांनीनामनिर्देशित केलेले एक केंद्रीय कॅबिनेट मंत्री.

**राज्य मुख्य माहिती आयुक्ताची आणि राज्य माहिती आयुक्तांची नियुक्ती, राज्यपाल, पुढील व्यक्तींच्या मिळून बनलेल्या समितीच्या शिफारशीनुसार करतात**

(एक) मुख्यमंत्री, जे या समितीचे अध्यक्षपदीय व्यक्ती असतात;

(दोन) विधानसभेतील विरोधी पक्षनेता; आणि

(तीन) मुख्यमंत्र्यानी नामनिर्देशित केलेले एक कॅबिनेट मंत्री.

**प्रश्न – माहिती आयुक्त पदाचा कालावधी काय असतो ?**

उत्तर – मुख्य माहिती आयुक्त पदाचा कालावधी पाच वर्षांचा असतो , मात्र वयाची पासष्ट वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तीस हे पद धारण करता येत नाही .

**प्रश्न – केंद्रीय आणि महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचे पत्ते काय आहेत ?**

उत्तर – १) केंद्रीय माहिती आयोग , 'बी ' विंग , दुसरा मजला ,ऑगस्ट क्रांती भवन , भिकाजी कामा प्लेस, नवी दिल्ली – ११००६६

२) केंद्रीय माहिती आयोग, क्लब बिल्डींग , ओल्ड जवाहरलाल नेहरू कॅंपस , नवी दिल्ली , ११००६७

३) केंद्रीय माहिती आयोग, ब्लॉक नं.चार , चौथा मजला , ओल्ड जवाहरलाल नेहरू कॅंपस , नवी दिल्ली , ११००६७

राज्य माहिती आयोगाचे पत्ते

१) मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, १३ वा मजला , नवीन प्रशासन भवन , मंत्रालयासमोर, मुंबई.

२)राज्य माहिती आयोग , पुणे खंडपीठ,नवीन प्रशासकीय इमारत , ४ था मजला , कौन्सिल हॉलसमोर, पुणे १. संबधित जिल्हे – पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर ,सोलापूर.

३) राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ, १ ला मजला,कोकण भवन,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.संबधित जिल्हे – रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, ठाणे.

४)राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग ,बृहनमुंबई खंडपीठ , १३ वा मजला , नवीन प्रशासन भवन , मंत्रालयासमोर, मुंबई. संबधित जिल्हा – मुंबई

५) राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ, भातकुली, तहसील परिसर कार्यालय, कॅंप अमरावती, संबधित जिल्हे – अकोला, अमरावती,बुलढाणा, वाशीम , यवतमाळ.

६)राज्य माहिती आयोग , नाशिक खंडपीठ, विभागीय आयुक्त कार्यालय नाशीक.संबधित जिल्हे - नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार, अहमदनगर.

७) राज्य माहिती आयोग , नागपूर खंडपीठ , विभागीय आयुक्त कार्यालय,१ ला मजला, नवीन प्रशासकीय इमारत क्र. २, जिल्हा परिषदेसमोर , नागपूर .संबधित जिल्हे - भंडारा , चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर व वर्धा.

८) राज्य माहिती आयोग , औरंगाबाद खंडपीठ , अल्प बचत भवन ,कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे , औरंगाबाद .संबधित जिल्हे - औरंगाबाद, बीड, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, ऊस्मानाबाद, परभणी.

**प्रश्न - माहिती आयोगाची कर्तव्ये काय ?**

उत्तर - माहिती अधिकार अधिनियमातील कलम १८ नुसार , पुढील व्यक्तींकडून तक्रारी स्वीकारणे व त्याची चौकशी करणे हे, यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोग, किंवा राज्य माहिती आयोग यांचे कर्तव्य असते

(क) जन माहिती अधिकाऱ्याची नेमणूक केलेली नाही या कारणास्तव विनंतीचा अर्ज सादर करण्यास जी असमर्थ ठरली असेल अशी व्यक्ती;

(ख) या अधिनियमान्वये मागणी करण्यात आलेली कोणतीही माहिती मिळण्यास नकार मिळालेली व्यक्ती;

(ग) या अधिनियमान्वये माहितीसाठी किंवा माहिती मिळवण्यासाठी केलेल्या मागणीस विनिर्दिष्ट मुदतीत प्रतिसाद न मिळालेली व्यक्ती

(घ) अवाजवी वाटत असलेली फी भरण्यास जिला भाग पाडण्यात आले असेल अशी व्यक्ती;

(ङ) या अधिनियमान्वये; आपल्याला अपुरी, दिशाभूल करणारी किंवा खोटी माहिती देण्यात आली असे जिला वाटत असेल अशी व्यक्ती; आणि.

(च) या अधिनियमान्वये अभिलेख मिळविता येण्याच्या किंवा त्यासाठी विनंती करण्याच्या संबंधातील इतर कोणत्याही बाबीविषयी तक्रार करणारी व्यक्ती.

त्याचप्रमाणे एखाद्या प्रकरणामध्ये चौकशी करण्यासाठी वाजवी कारणे आहेत याबाबत जर, केंद्रीय माहिती आयोगाची किंवा राज्य माहिती आयोगाची खात्री झाली तर आयोग त्याबाबतची चौकशी सुरू करू शकतो .

**प्रश्न - कलम १८ नुसार आलेल्या तक्रारीच्या बाबतीत माहिती आयोगाला कोणकोणते अधिकार असतात ?**

उत्तर - कलम १८ (२) अन्वये कोणत्याही बाबीची चौकशी करताना, यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोगाला, किंवा राज्य माहिती आयोगाला पुढील बाबतीत, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) या अन्वये दाव्याची न्यायचौकशी करताना दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित करण्यात आलेले आहेत, तेच म्हणजे खालील अधिकार असतात ;

(क) व्यक्तींना हजर राहण्याबाबत समन्स पाठवून त्यांना हजर करविणे आणि त्यांना शपथेवर तोंडी किंवा लेखी साक्षीपुरावा देण्यास व दस्तऐवज किंवा वस्तू सादर करण्यास भाग पाडणे

(ख) दस्तऐवजांचा शोध घेण्यास आणि पाहणी करण्यास फर्मविणे;

(ग) शपथपत्रावर साक्षीपुरावा घेणे;

(घ) कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयाकडून कोणताही शासकीय अभिलेख किंवा त्याच्या प्रती यांची मागणी करणे;

(ङ) साक्षीदारांची किंवा दस्तऐवजांची तपासणी करण्याकरिता समन्स काढणे; आणि
(च) विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब;
(४) संसदेच्या, किंवा यथास्थिति, राज्य विधानमंडळाच्या अन्य कोणत्याही अधिनियमात विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोग, या अधिनियमान्वये कोणत्याही तक्रारीची चौकशी करतांना, सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील ज्या अभिलेखास हा अधिनियम लागू होतो, अशा कोणत्याही अभिलेखाची तपासणी करू शकतात , आणि सार्वजनिक प्राधिकरण कोणत्याही कारणास्तव, आयोगापासून असा कोणताही अभिलेख रोखून ठेवु शकत नाहीत

**प्रश्न – कलम १९ नुसार केलेल्या अपीलावर निर्णय घेताना माहिती आयोगाला कोणते अधिकार असतात**

उत्तर – केंद्रीय माहिती आयोगास, किंवा यथास्थिति, राज्य माहिती आयोगास कलम १९ नुसार केलेल्या अपीलावर  निर्णय करण्याच्या प्रक्रियेत पुढील अधिकार असतात ,–
(क) या अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करणे सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाययोजना करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मविणे; ज्यामध्ये पुढील गोष्टीचाही समावेश असतो,–
(एक) एखाद्या विशिष्ट स्वरूपात माहिती मिळण्याची विनंती केली असल्यास त्या स्वरूपात माहिती पुरवणे;
(दोन) केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची, किंवा यथास्थिति, राज्य जन माहिती अधिकाऱ्याची नियुक्ती करणे;
(तीन) विवक्षित माहिती किंवा माहितीचे प्रवर्ग प्रसिध्द करणे;
(चार) अभिलेख ठेवणे, त्याची व्यवस्था ठेवणे व तो नष्ट करणे, यांसंबंधातील त्याच्या पध्दतीत आवश्यक ते बदल करणे;
(पाच) त्याच्या अधिकाऱ्यांना माहितीच्या अधिकाराचे प्रशिक्षण देण्याच्या तरतुदीत वाढ करणे;
(सहा) कलम ४ च्या पोटकलम (१) च्या खंड (ख) चे अनुपालन करून आयोगाला वार्षिक अहवाल सादर करणे;
(ख) कोणत्याही नुकसानीबद्दल किंवा झालेल्या अन्य हानीबद्दल भरपाई देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मविणे;
(ग) या अधिनियमामध्ये तरतूद केलेली कोणतीही शास्ती लादणे;
(घ) अर्ज फेटाळणे.

**प्रश्न – तक्रार किंवा अपीलांवर निर्णय घेताना माहिती आयोगाला कोणते अधिकार आहेत ?**

उत्तर – कलम १९ नुसार केलेल्या अपीलावर निर्णय घेताना , जन माहिती अधिकाऱ्याने, कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळण्याबाबतचा अर्ज स्वीकारण्यास नकार दिला आहे, किंवा कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत माहिती सादर केलेली नाही. किंवा माहिती मिळवण्यासी केलेली विनंती दुष्ट हेतूने नाकारली आहे किंवा जाणूनबुजून चुकीची अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे, किंवा मागितलेली माहिती नष्ट केलेली आहे, किंवा माहिती सादर करण्यात कोणत्याही प्रकारे अडथळा आणला आहे, असे आयोगाचे मत झाले असेल तर, तो, अर्ज स्वीकारीपर्यंत किंवा माहिती देईपर्यंत प्रत्येक दिवसाला रूपये दोनसे पन्नास इतकी शास्ती लादू शकतो तथापि, अशा शास्तीची एकूण रक्कम पंचवीस हजार रूपयांपेक्षा अधिक असत नाही .

परंतु जन माहिती अधिकाऱ्यास, त्याच्यावर कोणतीही शास्ती लादण्यापूर्वी आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी द्यावी लागते

तसेच कोणत्याही तक्रारींवर किंवा अपिलावर निर्णय देतेवेळी ,राज्य जन माहिती अधिकाऱ्याने, कोणत्याही वाजवी कारणांशिवाय आणि सातत्याने, माहिती मिळण्याबाबतचा अर्ज स्वीकारण्यात कसूर केली आहे किंवा कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेवर माहिती सादर केलेली नाही, किंवा माहिती मिळवण्याची विनंती दुष्ट हेतूने नाकारलेली आहे किंवा जाणूनबुजून चुकीची, अपूर्ण किंवा दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे, किंवा मागितलेली माहिती नष्ट केलेली आहे, किंवा माहिती सादर करण्यात कोणत्याही प्रकारे अडथळा आणला आहे, जर असे मत झाले तर, आयोग जन माहिती अधिकाऱ्याविरूध्द, किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याविरूध्द, त्याला लागू असलेल्या सेवानियमांन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करू शकतात.

**प्रश्न – नियम करण्याचे अधिकार कोणाला आहेत ?आणि कोणकोणत्या बार्बीसाठी नियम केले जाउ शकतात ?**

उत्तर – समुचित शासनाला, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियम करता येतात

(२) विशेषत: आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेला बाध न येऊ देता या नियमांमध्ये पुढीलपौकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी तरतूद करता येते :-

(क) कलम ४ च्या पोट-कलम (४) अन्वये ज्याचा प्रसार करावयाचा आहे अशा साहित्याच्या प्रसिध्दी माध्यमाच्या खर्चाएवढी किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढी किंमत;

(ख) कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये देय असलेली फी;

(ग) कलम ७ ची पोट-कलमे (१) आणि (५) अन्वये देय असलेली फी;

(घ) अधिकारी आणि कर्मचारी यांना कलम १३ च्या पोट-कलम (६) अन्वये देय असलेले वेतन व भत्ते आणि कलम १६ च्या पोट-कलम (६) खालील त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ;

(ङ) कलम १९ च्या पोट-कलम (१०) अन्वये दाखल केलेल्या अपिलांवर निर्णय देतेवेळी, यथास्थिति, केंद्रीय माहिती आयोगाने, किंवा राज्य माहिती आयोगाने अनुसरावयाची कार्यपध्दत; आणि

(च) विहित करणे आवश्यक असेल अशी अथवा विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.